# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५२६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२१/०८/२०१

**१) गैरकायदयाची मंडळी जमवुन भांडण व मारहान केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १९/०८/२०१६ रोजी २१.०० वा. दर. यातील आरोपी क्र. १ हा तंटामुक्ती समीतीचा दि. १९/०८/२०१६ रोजी अध्यक्ष म्हणुन निवडुण आला व त्याने मिरवनणुकीची कोणतीच परवांगी न घेता गाडीवर डि. जे. लावुन अनाधिकृतपने मिरवणुक काढली व फिर्यादीचे घरा समोरील रोडवर डि.जे. वाजवत, नाचत गुलाल उधळुन शिविगाळ करीत असतांनी फिर्यादीने शिविगाळ करून नका असे हटकल्या वरून आरोपीतांनी गैर कायदयाची मंडळी जमवुन आरोपी क्र. ४ ने फिर्यादीचा उजवा हात पकडुन विनयभंग केला व आरोपी क्र. ५,२,३ असे तिघांनी मिळुन फिर्यादीचा पुतण्या हा भांडण सोडविण्यास गेला असता त्यास आरोपी क्र. ३ ने ओढतान केली व आरोपी क्र. १ ने मा. जिल्हाधिकारी भंडारा यांनी जारी केलेली कलम ३७(१)(३) मपोका. चे उल्लंघन केल्याने असे फिर्यादीचे तोंडी व डॉ.रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १४३,१४७,३५४,३२३,५०४,१८८ भादंवि सहकलम १३५ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. संतापे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**२) मोटार सायकल स्लीप झाल्याने,दोन जखमी . :—**

दिनांक २०/०८/२०१६ रोजी ०७.१५ वा. दर. यातील जखमी व आरोपी मोटार सायकल क्र. एमएच ३५ बी ०६८९ चा चालक हा आपल्या ताब्यातील मोटार सायकलने जखमी एकनाथ बांते सोबत डब्बलसिट लाखनीकडे जात असतांना आरोपीने स्वतःच्या ताब्यातील मोटार सायकल हयगयीने, निष्काळजीपने, भरधाव वेगाने चालवुन मोटार सायकल ही स्लीप होवुन स्वतः व मागे बसलेल्या एकनाथ यास गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने अपघात चौकशी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३८ भादंवि सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. टेंभुर्णे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलची सायकलला धडक लागल्याने तीन जखमी . :—**

दिनांक २०/०८/२०१६ रोजी १९.१० वा. दर. यातील आरोपी मोटार सायकल क्र. एमएच ३६ सी ०५५८ चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकला हेडलाईट नसतांना सुधा रात्रीच्या वेळी भरधाव वेगाने,हयगयीने, निष्काळजिपणे चालवुन समोर जात असलेला श्रीराम नेवारे यास मागेवुन चिचटोला डांबरी रोड शिवार येथे धडक मारून स्वतः मोटार सायकलसह डांबरी रोडवर पडुन सायकल स्वारास व स्वतः तसेच मोसाचे मागे बसलेला बंडु दयाराम धार्मीक यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने जखमीचे बयान असे फिर्यादी रमेश जानबाजी खेडकर वय ४२ वर्ष, यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३८ भादंवि सहकलम् १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**४) ट्रकची मारोती ओमनीला धडक लागल्याने जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २०/०८/२०१६ रोजी १६.४५वा. दर. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने, निष्काळीपने चालवुन फिर्यादीचे वाहन मारोती ओमनी क्र. एमएच ३६ एच ४५३९ ला मागेहुन धडक मारुन त्यात बसलेली सौ. वंदना संजय बडवाईक यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी श्रीकांत श्रावण ढेंगे वय ३९ वर्ष, रा. मुरमाडी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. मोरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.